# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

### कार्यवृत्त

### Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 196
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : मंगळवार, दिनांक 8 ऑक्टोबर 2024
**(Day and Date)** : Tuesday, 8th October 2024

**वेळ** (Time) : सकाळी 12.30 वाजता (12.30 pm)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 196 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 196 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने मंगळवार, दि. 08 ऑक्टोबर 2024 रोजी दुपारी12.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय घनश्याम भावे, मा. कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक कचरू सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. श्री. नरेंद्र अनंतराव जोशी, अंबेजोगाई | | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | | सदस्य |
| 07 | मा.डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 08 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 09 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. गर्जे, नाशिक | सदस्य |
| 05 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 06 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण | सदस्य |

| अनु.क्रमांक Subject No. | | तपशील Details |
|---|---|---|
| 196.1 | 196.1.1 | **स्वागत** : मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| | 196.1.2 | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा क्रमांक XX 1989 द्वितीय अनुसूचीमधील परिनियम 6 (L) मधील विविध 5 क्षेत्रांतील तज्ज्ञ या उपविभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल यांनी 3 वर्षांसाठी नामनिर्देशित केलेली (1) **संशोधन क्षेत्र : श्री. उदित शेठ, (2) उद्योग क्षेत्र : डॉ. संजय चोरडिया, (3) वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्र : डॉ. अनिल कुलकर्णी** यांचा पदावधी 20 सप्टेंबर 2024 रोजी संपुष्टात आला.<br>कायदा क्रमांक XX 1989 द्वितीय अनुसूचीमधील परिनियम 6 (m) मधील इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेल्या **प्रा. सत्यकाम** यांची Uttar Pradesh Rajarshi Tandon Open University (UPRTOU) येथे कुलगुरू पदावर नियुक्ती झाल्यामुळे व्यवस्थापन मंडळावरील त्यांचा पदावधी ऑगस्ट 2024 मध्ये संपुष्टात आला.<br>वरील चारही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या कार्यकाळात व्यवस्थापन मंडळाच्या बैठकांमध्ये आपला सहभाग नोंदवून बहुमोल योगदान दिले. त्यांच्या योगदानाप्रित्यर्थ कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना या सभेत आमंत्रित करण्यात आले. त्यांपैकी श्री. उदित शेठ, आणि प्रा. सत्यकाम त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे या सभेत उपस्थित राहू शकले नाहीत.<br>डॉ. संजय चोरडिया आणि डॉ. अनिल कुलकर्णी या दोन सन्माननीय सदस्यांचा 100 ग्रॅम चांदीची साममुद्रा, शाल, पुष्पगुच्छ देऊन विद्यापीठाचे कुलगुरू तथा व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष यांनी सत्कार केला.<br>याप्रसंगी डॉ. चोरडिया तसेच डॉ. कुलकर्णी यांनी त्यांच्या कार्यकाळातील विद्यापीठाच्या प्रगतीबाबत तसेच कार्यशैली बाबत आनंद व्यक्त केला. तसेच महाराष्ट्र राज्याच्या महामहिम राज्यपालांनी ही संधी दिल्याबद्दल त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.<br>या सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा तसेच योगदानाचा विद्यापीठाला विविध गोष्टींसाठी उपयोग झाला अशी भावना मा. कुलगुरूंनी व्यक्त केली. तसेच विद्यापीठात भविष्यात अनेकविध प्रकल्प राबवून विद्यापीठ प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करीत आहे. या सदस्यांचा पदावधी जरी समाप्त झाला असला तरी भविष्यात त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा विद्यापीठाला जेव्हा जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा तेव्हा त्यांनी योगदान देण्याबाबत या सदस्यांना आवाहन केले. त्याला सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली. |
| | 196.1.3 | कायदा क्रमांक XX 1989 द्वितीय अनुसूचीमधील परिनियम 6 (m) मधील इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरूंनी प्रा. एन.के. दास यांचे नामनिर्देशित केले. Prof. N.K. Dash हे या बैठकीसाठी ऑनलाईन उपस्थित होते. त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने मा. कुलगुरूंनी त्यांचे स्वागत केले. सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले. |

| | | |
|---|---|---|
| 196.2 | 196.2.1 | **दिनांक 02 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या 195 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 2 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या 195व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 196.2.2 | **दिनांक 02 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या 195 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 2 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या 195व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाचे वाचन व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. भरड यांनी केले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 196.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 196.3.1<br>सभा व दप्तर कक्ष | **प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदाची पुर्नस्थापना करणेबाबत....**<br>**टिपणी** : दि. 20 जून 2023 रोजी आयोजित व्यवस्थापन मंडळातील ठराव क्र. 188.3.15 अन्वये मंजूर केलेल्या Research, Patent and IPR, Agro Tourism and Extension, Online learning व Innovation, Incubation and Start up या क्षेत्रांऐवजी Rural Development and Entrepreneurship, Gaming Animation and Software, Dance Drama and Music, Online Education and Naturopathy या क्षेत्रांतील प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदांची पुनर्स्थापना, त्यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती, मानधन/वेतन, इत्यादी अनुषंगिक बाबींवर निर्णय होणेस्तव मा. व्यवस्थापन मंडळासमोर पुर्नविचारार्थ<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. कुलगुरूंनी सदर विषयाची पार्श्वभूमी विषद केली. यापूर्वी ठराव क्र. 188.3.15 अन्वये मान्य केलेल्या Research Patent and IPR, Agro Tourism and Extension, Online learning व Innovation, Incubation and Start up या क्षेत्रांऐवजी विद्यापीठ सुरू करत असलेल्या विविध नवीन विद्याशाखांच्या आवश्यकेनुसार खालील नवीन क्षेत्रांमधील (1) Rural Development and Entrepreneurship, (2) Gaming Animation and Software, (3) Dance Drama and Music, (4) Online Education (5) Naturopathy प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस यांची पुनर्स्थापना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार व अटी व शर्तीनुसार करार पद्धतीने 2 वर्षांसाठी आणि पुढे एक वर्ष वाढविण्याच्या शक्यतेसह रुपये 1,50,000/- व रुपये 10,000/- अतिरिक्त मानधन अशा एकूण रुपये 1,60,0000/- अशा एकत्रित मानधनावर नियुक्तीच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 196.3.2<br>वित्त विभाग | **दि. 4 ऑक्टोबर 2024 रोजी होणाऱ्या वित्त समितीचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** : दि. 4 ऑक्टोबर 2024 रोजी वित्त समिती आयोजित करण्यात आली आहे. सदर समितीचे इतिवृत्त मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>ठराव : दि. 04 ऑक्टोबर 2024 च्या इतिवृत्तातील विषय क्र. 01, 02, 03, 04, 09, 10, 11, 12, 13, 15, 16, 19, 20, 21, 22, 23, 24, 27, कार्योत्तर मान्यता विषय क्र. 01 व ऐनवेळचे विषय क्र. 01, 02, 04, यास वित्त समितीने मान्यता प्रदान केल्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान |

करण्यात आली. तसेच खालील विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. वित्त समितीने केलेल्या शिफारशी नुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत अंतिमत: मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र. 05 :** विद्यापीठाला प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या बँकांमध्ये विद्यापीठाच्या मुदत ठेव रकमेच्या व्याजदरामध्ये काही प्रमाणात सवलत देणेबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यीपीठाला प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या दोन बँका असून विद्यापीठ मुख्यालयात असलेली पंजाब नॅशनल बँक व शहरातील एच.डी.एफ.सी. बँक ह्या आहेत. त्यांच्यामार्फत बँकेच्या विविध सेवा पुरविल्या जातात. त्यांनी मुदत ठेवीत रक्कम ठेवतांना व्याजदरात सुट देऊन ठेवी ठेवण्याच्या केलेल्या विनंतीवर वित्त समितीच्या बैठकीत खालील मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली.

01 पंजाब नॅशनल बँक व एच.डी.एफ.सी. बँकेसमवेत केलेल्या कोणत्याही व्यवहारावर बँक चार्जेस लावत नाही.

02 विद्यापीठाने वित्त विभागात लागु केलेल्या ERP संगणक प्रणालीमुळे विद्यापीठाचे वित्तीय व्यवहार पुर्णत: बँकेमार्फत होत असल्याने त्या कामासाठी बँकेला अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे लागले आहे.

03 विद्यापीठाचे Payment Gateway एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत सुरु असून विद्यार्थ्यांना किंवा विद्यापीठाला कोणत्याही प्रकारचे शुल्क / चार्जेस आकारले जात नाहीत. यापूर्वीच्या IDFC बँकेमार्फत Payment Gateway सुरु होते त्यावेळी त्या बँकेने विद्यार्थ्यांकडून एक वर्षभरात 40 ते 45 लक्ष रुपये शुल्क आकारले होते.

04 पंजाब नॅशनल बँकेमार्फत होणारे वित्तीय व्यवहार व बँकेचे रिकन्सीलियशन त्याच दिवशी पुर्ण होत असल्याने सदर बँक उत्कृष्ट सेवा देत असल्याचे नमुद झाले आहे.

05 विद्यापीठ परिसरात सदर बँकेकडे वर्षभराकरिता कोणतीही दिर्घ मुदत ठेवीची रक्कम नाही त्यामुळे सदर बँकेस विद्यापीठाचे व्यवहार विनामुल्य करणे परवडत नसल्याचे त्यांच्या तोंडी व लेखी स्वरुपात सादर केल्याचेही समिती बैठकीत नमुद झाले.

06 यापूर्वी विद्यापीठात असलेली सेंट्रल बँक ऑफ इंडिया विद्यापीठाचे व्यवहार परवडत नसल्याने व बाहेरील व्यवहार विद्यापीठ परिसरात राहुन मिळत नसल्याने सदर बँकेची शाखा त्यांनी बंद केली.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या अंतिम मान्यतेकरिता करण्यात येत आहे.

01 पंजाब नॅशनल बँक व एच.डी.एफ.सी. बँक यांच्याकडे प्रत्येकी 200 कोटी पर्यंतच्या मर्यादेत दिर्घ मुदतीची गुंतवणुक करण्यात यावी.

02 सदर मुदतठेव प्रकारात गुंतवणुक करतांना या दोन बँकांचे त्या दिवसाचे त्यांच्या ट्रेझरीने दिलेल्या व्याजदराप्रमाणे सदर मुदतठेवीत गुंतवणुक करण्यात यावी.

03 याव्यतिरिक्त त्यांच्याकडे होणारी इतर गुंतवणुक ही इतर बँकांच्या व्याजदराच्या तुलनात्मक तक्त्यात यांचे व्याजदर जास्त असतील तर त्यांच्याकडे ठेवता येईल.

04 Noncallable प्रकारातील दिर्घ मुदतीची मुदतठेव ही मागील बैठकीत ठरलेल्या रु. 500 कोटीच्या मर्यादेत ठेवता येईल.

05 Callable प्रकारातील गुंतवणुकीची मर्यादा ही 100 कोटीपर्यंतची असेल.

06 विद्यापीठात प्रवेश प्रक्रियेदरम्यान Payment Gatway मधुन प्राप्त होणारी रक्कम रोजच्या रोज दिर्घ मुदतीत सर्व प्रक्रिया करुन गुंतवणे शक्य नसल्याने ती उपरोक्त दोन्ही बँकेत अतिअल्प मुदतीत (किमान 7 दिवस ते 46 दिवस) या काळाकरिता गुंतवण्यात यावी. गुंतवणुकीचे दर त्या दोन बँकेच्या ट्रेझरीने दिलेल्या त्या दिवसाच्या दराप्रमाणे असावेत.

उपरोक्तप्रमाणे वित्त समितीत सर्वानुमते गुंतवणुकीच्या अनुषंगाने शिफारशी अंतिम मान्यतेकरिता मा. व्यवस्थापन मंडळाकडे सादर करण्यात आल्या होत्या त्यानुसार वित्त समितीच्या शिफारशीवर व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन सदर दोन्ही बँका विद्यापीठाच्या व्यवहारावर कोणतेही मुल्य (Charges) लावत नसल्याने वरीलप्रमाणे दिर्घ मुदतीत ठेवी विद्यापीठाच्या निधीच्या करण्याचा निर्णय व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्य करण्यात आला व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र. 06 :** विद्यापीठातील नियमित वेतनश्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन कपात करण्यात येणाऱ्या Employee Welfare Fund Schemes बाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** वित्त समितीच्या बैठकीमध्ये Employee Welfare Fund Schemes तयार करणेकरिता समिती गठीत केले आहे. याबाबत समितीने सविस्तर स्कीम तयार करुन सादर केल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्याचे त्यावर मत नोंदवून घेण्याचे ठरले व मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने सदर स्कीम प्रत्यक्षात अंमलबजावणीत आणण्याचे ठरले. सदर स्कीमकरिता विद्यापीठाचे अंशदान समितीने सुचविल्याप्रमाणे अदा करण्याचेही ठरले. याकरिता स्वतंत्र बँक खाते पंजाब नॅशनल बँकेत उघडण्यात यावे व त्यामार्फत सर्व व्यवहार करण्यात यावा. रोखीने कोणतेही व्यवहार करण्यात येऊ नये. तसेच यापूर्वीची शिल्लक रक्कम रु. 8,04,765/- (रुपये आठ लक्ष चार हजार सातशे पासष्ट फक्त) त्या खात्यावर वर्ग करण्यात यावे. याप्रमाणे संपुर्ण कार्यवाहीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यता आली.

**इतिवृत्तातील विषय क्र. 07 :** विद्यापीठातील प्राध्यापकांना त्यांच्या दिर्घ सुटीच्या कालावधीत कार्यालयात कामाकरिता बोलविल्यास त्यांना सदरच्या कालावधीचा टी. ए. देण्याबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** सदर विषय वित्त समिती बैठकीत चर्चेला आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन दिर्घकालीन सुटीच्या कालावधीत शिक्षक कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष विद्यापीठात येऊन काम केले असल्यास त्या कालावधीचा टी. ए. अलाउन्स अदा करण्याबाबत अनुकुलता दर्शविली होती. त्याप्रमाणे मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत या शिफारशीस अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली. मात्र प्रतिमहिना संबंधीतांनी त्यांच्या बायोमेट्रीक्स हजेरीपत्रासह देयक त्यांच्या विभागाप्रमुखामार्फत आस्थापना कक्षाकडे सादर करावीत. आस्थापना विभागाने सदर देयक तपासून देयक पारित करण्याकरिता वित्त विभागाकडे सादर करावे. वित्त विभागाने मासिक वेतनात सदरची देयके अदा करावीत. या कार्यवाहीस व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र. 08 :** विभागीय केंद्रावरील नियमित वेतनश्रेणीतील अधिकारी व कर्मचारी यांना विद्यापीठ मुख्यालयातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या OPD & IPD सुविधेप्रमाणे वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणेबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** या संदर्भाने वित्त समितीने गठीत केलेल्या समितीचा अहवाल प्रत्यक्ष लागु करण्यास व त्यावर होणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मा. कुलगुरु महोदयांना प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आले.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 14 : आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये दिपावली निमित्त सर्व नियमित शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी, करारावरील अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, व दैनंदिन वेतनावरील कर्मचारी यांना सानुगृह अनुदान देणेबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : वित्त समितीने शिफारस केल्यानुसार सानुग्रह देण्याबाबत गतवर्षीप्रमाणे सन 2024 या वर्षात दि. 1 ऑक्टोबर 2023 ते सप्टेंबर 2024 पर्यंत किमान सहा महिने व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या नियमित शिक्षक शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी आणि करारावरील अधिकारी / कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत आस्थापना कक्षाकडून प्रस्तावित केल्यानुसार मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानात 10 टक्के वाढ करून खालीप्रमाणे देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

| **अक्र** | **प्रकार** | **रक्कम** | **10 टक्के वाढीसह** |
|---|---|---|---|
| 01 | नियमित शिक्षक/ शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी | 35,000/- | 38,500/- |
| 02 | करारावरील अधिकारी व कर्मचारी | 30,000/- किंवा प्रत्यक्ष घेत असलेले दहमहा एकत्रित वेतन यापैकी जी कमी असेल ती रक्कम | रु. 30,000/- किंवा प्रत्यक्ष वेतन घेत असलेल्या रकमेत 10 टक्के वाढ करून जी कमी असेल ती रक्कम |
| 03 | देनंदिन वेतनावरील कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, व स्वच्छता कर्मचारी | 10,000/- | 11,000/- |

वरीलप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 17 : विद्यापीठाचे आर्थिक वर्ष 2023-24 चे अंकेक्षण पुर्ण होऊन लेखापरीक्षकाने सादर केलेल्या अंकेक्षण अहवालावर सविस्तर चर्चा होऊन अंतिम मान्यतेकरिता मा. व्यवस्थापन मंडळाकडे शिफारशीसह पाठविणेबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत वित्त अधिकारी यांनी आर्थिक वर्ष 2023-24 च्या अंकेक्षण अहवालाबाबत सविस्तर सादरीकरण केले. सदर सादरीकरणाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे गेली अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या अंकेक्षणातील त्रुटींचे निराकरण करून सदरच्या त्रुटी पुर्ण करुन अंकेक्षण अहवाल तयार करण्यात आला. त्यानुषंगाने मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत विद्यापीठाचे वित्त अधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला. त्याचप्रमाणे वित्त अधिकारी व वित्त विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात आले.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 18 : डॉ. चंद्रकांत पवार, उपकुलसचिव, परीक्षा कक्ष वैद्यकीय देयकाच्या प्रतिपुर्तीबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : वित्त समितीच्या बैठकीतील शिफारशीप्रमाणे संबंधीतास वैद्यकीय प्रतिपुर्ती (बाह्यरुग्ण) म्हणून रु. 88,234/- इतक्या रकमेच्या देयकास विशेष बाब म्हणून मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 25 : विद्यापीठातील नियमित वेतनश्रेणीतील अधिकारी व कर्मचारी यांना सण अग्रीमची रक्कम वाढवून देणेबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : वित्त समितीच्या बैठकीतील शिफारशीप्रमाणे सर्व सेवानिवृत्तांची माहिती तपासून घेण्यात यावी व त्याप्रमाणे प्रत्येकाचे फॉर्म भरुन घेऊन सण अग्रिम रु. 25,000/- मध्ये वाढ करून

रु. 40,000/- करण्यास व सदर अग्रिमाच्या रकमेची समान दहा हप्त्यात वसुली करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 26 : विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना गृह कर्जावरील व्याजदरात सुट मिळणेबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : वित्त समितीच्या बैठकीच्या शिफारशीनुसार, शासन विद्यापीठास कोणत्याही प्रकारचे घर खरेदी किंवा घर बांधकामासाठी (अग्रीम अथवा कर्ज) देत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी वेग-वेगळ्या बँकेकडून घर खरेदी करण्यासाठी कर्ज घेतले जाते. शासनाच्या कर्मचारी कल्याण योजनेप्रमाणे विद्यापीठानेही कर्मचाऱ्यांना कर्ज न देता कर्जाच्या व्याजदरामध्ये शासन निर्णयातील टक्केवारीप्रमाणे म्हणजेच 1.5 टक्के व्याजदरातील सवलत देण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विविध बँकांची वेगवगळी व्याजदर लक्षात न घेता व कर्जाची अपर मर्यादा रु. 1 कोटी पर्यंत असल्याचे पहावे व सरसकट 1.5 % व्याज दर सवलत विद्यापीठाच्या निधीतुन संबंधीत कर्मचाऱ्यांना अदा करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 28 : विद्यापीठाचे आर्थिक वर्ष 2024-25 चे लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकाची नेमणूकीस मुदतवाढीच्या निर्णयाबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : विद्यापीठाचे आर्थिक वर्ष 2023-24 चे अंकेक्षण मे. ए. एस. बेदमुथा आणि कंपनी या फर्मने केले असून, मागील अनेक वर्षाचे अंकेक्षणाचे प्रलंबित परिच्छेद निकाली काढून त्यांचे सदर वित्तीय वर्षात त्याच्या नोंदी घेण्यात आल्या व त्याबाबत अंकेक्षणात कोणतेही आक्षेप आलेले नाही. या बाबींचा विचार करून 2024-25 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यास मे. ए. एस. बेदमुथा आणि कंपनी या फर्मकडून करुन घेण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर फर्मने केलेल्या मागणीचा विचार करून पूर्वीच्या अटी शर्तींच्या अधिन राहून त्यांनी मागणी केल्यानुसार पूर्वीच्या व्यावसायीक फीसमध्ये 15 % वाढ करण्याबाबत वित्त समितीच्या बैठकीत शिफारस करण्यात आली. सदर शिफारशीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली.

**इतिवृत्तातील विषय क्र.** 03 : विद्यापीठाच्या दिनांक 13 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या गुंतवणुक समितीच्या निर्णयाबाबत.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : या संदर्भाने सर्व वृत्तांतावर वित्त समिती बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. इतर बँकांनी जास्तीत जास्त 7.90 असा दर दिल्याने व अंतिमत: IDBI बँकेने दिलेला व्याजदर 7.92 ऐवजी 7.91 मान्य करण्यात आला. मात्र दि. 13.09.2024 पासून 17.09.2024 पर्यंत एकूण चार दिवसाचे 7.91 प्रमाणे होणारे रु. 200 कोटीवरील व्याज IDBI बँकेकडून वसुल करावे. असे सर्वानुमते ठरले होते. तसेच तशा आशयाचे संबंधीत बँकेने लेखी पत्रही विद्यापीठास दिलेले आहे. सदर पत्रात केलेली मागणी वित्त समितीमध्ये मान्य केली मात्र अंतिम मान्यतेकरिता मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यास शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

196.4 **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय**

196.4.1 नियोजन कक्ष **विद्यापीठात भाषा अनुवाद केंद्र स्थापन करणे**

**टिपणी** : सध्याच्या विविध माध्यमांद्वारे जग शैक्षणिक व व्यावसायिक दृष्ट्या एकमेकांशी जोडले गेले आहे. या क्षेत्रांत बहुभाषिक संप्रेषण आवश्यक आहे.

विद्यापीठाची सगळी पाठ्यपुस्तके ही मराठी भाषेत आहेत. काही पुस्तकांच्या अनुवादासाठी बाहेरील अनुवादकांची मदत घेण्यात येते. तसेच मराठी भाषेत लिखित परंतु कॉपी राईट नसलेली काही महत्त्वाच्या विषयांवरील पुस्तके इतर भाषांमध्ये अनुवादीत केली जातील. विद्यापीठातील काही शिक्षणक्रम

| | | |
|---|---|---|
| | | महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठामार्फत राबविण्याची मागणी होत आहे. परंतु या शिक्षणक्रमांची पाठ्यपुस्तके मराठी भाषेत आहेत ती पुस्तके अनुवादीत केल्यानंतर हा प्रयोगही भविष्यात यशस्वी होईल. भाषा अनुवाद केंद्रामार्फत भाषा अनुवाद अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला अनुवाद क्षेत्रातील व्यवसाय/नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.<br>या क्षेत्रांतील क्रॉस-कल्चरल कम्युनिकेशनला चालना देण्याचे महत्त्व ओळखून विद्यापीठात भाषा अनुवाद केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** या संदर्भात मा. कुलगुरूंनी भाषा अनुवाद केंद्राचे महत्त्व विषद केले. या केंद्रासाठी एक केंद्रप्रमुख, दोन अनुवादक, एक मुद्रितशोधक आणि एक सहायक अशी पदे करारावर भरण्यात यावीत. यासाठी परिनियम तयार करण्यात यावा. परिनियमास महामहिम राज्यपाल सो. यांची मान्यता घेण्यात यावी. अशी चर्चा होऊन सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |
| | 196.4.2<br>आस्थापना कक्ष | **करारावरील शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांची करारावरील सेवेसाठी उच्च वयोमर्यादा वाढविणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर ....**<br>**टिपणी :** विद्यापीठात सेवानिवृत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. नवीन भरती प्रक्रियेद्वारे नवीन भरती सध्या केलेली नाही. त्यामुळे अपुरे कर्मचारी / मनुष्यबळ असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे. त्यामुळे जे शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना पुन्हा करारावर नियुक्त करण्यात येत आहे. करारावर नियुक्ती करताना वयोमर्यादेच्या पात्रतेसाठी विद्यापीठाच्या कायद्यातील, परिनियमातील तरतुदींचा आधार घेतला जातो. विद्यापीठाच्या परिनियमात वयोमर्यादा 62 वर्षे तर सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासननिर्णयानुसार वयोमर्यादा 65 वर्षे आहे तथापि ज्या व्यक्तींच्या सेवा विहित वयोमर्यादेनंतरही सुरु ठेवणे सक्षम प्राधिकरणास आवश्यक वाटल्यास अशा बाबतीत 70 वर्षांपर्यंतच व्यक्ती कार्यरत राहू शकतील. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाच्या आधारे विद्यापीठासाठी करारावरील नियुक्तीच्या वयोमर्यादेत वाढ करून 70 वर्षांपर्यंत करारावरील नियुक्ती करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** मा. कुलगुरूंनी याबाबत वस्तुस्थिती विषद केली. सदर प्रस्ताव हा फक्त करारावरील नियुक्तीसाठी मर्यादित नसून वेगवेगळ्या समित्यांवर नेमणूक केलेल्या तज्ज्ञ व्यक्तींच्या वयोमर्यादेचाही यात समावेश असेल. राष्ट्रीय स्तरावर तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठात शैक्षणिक पदांसाठी व केंद्र पुरस्कृत विद्यापीठांमध्ये वयोमर्यादा 70 वर्षे आहेच. महाराष्ट्र शासन सा. प्र. वि.च्या शासन निर्णय क्र. संकीर्ण 2715/प्र.क्र. 100/13 दि. 17/12/2016 मधील (अ)च्या 8 नुसार वयोमर्यादा 65 वर्षे असली तरी त्याच शासन निर्णयात अशा व्यक्तीची निकड आणि कामाचे स्वरुप तसेच त्यांच्या नियुक्त प्राधिकरणाने संमत केल्यास 70 वर्षांपर्यंत वयोमर्यादा वाढविता येऊ शकते. त्यापेक्षा जास्त वयोमर्यादा असू नये. तसेच वयोमर्यादा शैक्षणिक पदांसाठी आणि शिक्षकेतर 'अ' श्रेणीतील अधिकारी यांचेसाठी असेल. सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. |
| | | वरील सर्व विषयांवर समाधानकारक चर्चा होऊन ठराव करण्यात आले. मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सर्व उपस्थित सदस्यांचे मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव तथा कुलसचिव यांनी आभार मानले व सभा समाप्त करण्यात आली. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**